# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः02.05.2025** **वार : शुक्रवार**

---

•भारतात सर्जनकेंद्रित अर्थव्यवस्थेचा उदय होत असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन. 'वेव्हज्' परिषदेचं मुंबईत शानदार उद्घाटन,

•महाराष्ट्र दिन विविध कार्यक्रमांद्वारे उत्साहात साजरा

•लोणावळा इथं राष्ट्रीय आयुष मिशन परिषदेचं केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते उद्घाटन

आणि

•देशात उष्णतेची लाट येत असल्याच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाकडून उपाययोजना करण्याच्या सूचना

**<u>वेव्हज</u>**

भारतात ऑरेंज इकॉनॉमी म्हणजेच सर्जनकेंद्रित अर्थव्यवस्थेचा उदय होत असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल मुंबईत केलं. वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल अँण्ड एन्टरटेन्मेंट समिट – 2025 अर्थात 'वेव्हज्' परिषदेचं शानदार उद्घाटन मोदी यांच्या हस्ते झालं., त्यावेळी पंतप्रधान बोलत होते. आशय, सर्जनशीलता आणि संस्कृती हे या नव्या अर्थव्यवस्थेचे तीन स्तंभ आहेत. या सर्जनकेंद्रित अर्थव्यवस्थेचा येत्या काही वर्षांत सकल देशांतर्गत उत्पन्नात मोठा वाटा असेल, असा विश्वास मोदी यांनी यावेळी व्यक्त केला. जगातील ॲनिमेशन मार्केट 430 अब्ज डॉलरहून अधिक असून पुढील 10 वर्षांत ते दुप्पट होणार असल्याचं मानलं जातं. भारताच्या ॲनिमेशन आणि ग्राफिक्स उद्योगासाठी वेव्हज् परिषदेमुळे यशाचं दार उघडलं जात असल्याचं मोदी यांनी सांगितलं.

**<u>बाईट–मोदी (46 सेकंद)</u>**

मुंबईतल्या जिओ वर्ल्ड कन्व्हेंशन सेंटरमध्ये झालेल्या या कार्यक्रमात राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, रेल्वे, माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव, परराष्ट्र व्यवहार मंत्री एस.जयशंकर, माहिती प्रसारण राज्यमंत्री डॉ.एल.मुरुगन, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार यांच्यासह देशविदेशातील मान्यवर उपस्थित होते.

भारत आज फिल्म प्रॉडक्शन, डिजिटल कंटेंट, गेमिंग, फॅशन आणि म्युझिक यांचं जागतिक केंद्र बनले असल्याचं मोदी यांनी यावेळी सांगितलं. मात्र मानवाला यंत्र न बनू देता अधिक समृद्ध आणि संवेदनशील बनवणे गरजेचं असल्याचं मोदी म्हणाले.

करमणूक क्षेत्र हे महाराष्ट्र आणि भारतासाठी विकासाचं नवं इंजिन आहे. वेव्हज परिषद हा केवळ एक कार्यक्रम नाही, तर ही एक चळवळ असल्याचं मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केलं.

भारतात पहिल्यांदाच इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजी अर्थात IICT मुंबईत सुरु होणार असल्याची माहिती, माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली.

अभिनेते अनुपम खेर यांनी प्रस्तावनेद्वारे वेव्हज् आयोजनाचा उद्देश सांगितला.

यावेळी गुरुदत्त, श्रीमती पी.भानुमती, राज खोसला, ऋत्विक घटक, सलील चौधरी यांच्या भारतीय सिनेमा मधील योगदानाच्या स्मरणार्थ टपाल तिकिटाचं अनावरण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात आलं.

केंद्रीय माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री एल. मुरुगन हे "भारताची लाइव्ह इव्हेंट्स अर्थव्यवस्था: एक अत्यावश्यक धोरणात्मक वाढ" यावरील श्वेतपत्रिकेचे अनावरण उद्या करणार आहेत. माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं सुरू केलेली ही पहिलीच श्वेतपत्रिका आहे. श्वेतपत्रिकेत भारताच्या वेगाने विस्तारणाऱ्या लाईव्ह मनोरंजन उद्योगाचे व्यापक विश्लेषण सादर करण्यात आलं आहे.

**<u>महाराष्ट्रदिन</u>**

महाराष्ट्र राज्याचा 66 वा स्थापना दिन काल मोठ्या उत्साहात साजरा झाला.

महाराष्ट्र दिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राज्यातल्या नागरीकांना मराठी भाषेतून शुभेच्छा दिल्या. मुंबईत व्हेवज् चं उद्घाटन करताना मोदी यांनी; या भूमीचा गौरवशाली इतिहास आणि इथल्या जनतेचं धैर्य हे राज्याच्या प्रगतीचे मजबूत आधारस्तंभ आहेत असे गौरवोद्गार काढले.

महाराष्ट्र राज्याच्या 66 व्या स्थापना दिनानिमित्त मुख्य शासकीय सोहळ्यात राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी दादर इथल्या छत्रपती शिवाजी महाराज मैदानावर ध्वजवंदन केलं. महाराष्ट्राला आधुनिक, बलशाली आणि प्रगत राष्ट्र बनवण्यासाठी आपण सर्वांनी एकत्रित प्रयत्न करू या, असं आवाहन राज्यपालांनी केलं. तसंच राजभवनातही राज्यपालांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आलं.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हुतात्मा चौकातल्या हुतात्म्यांच्या स्मारकावर पुष्पचक्र अर्पण केलं. तसंच वर्षा या शासकीय निवासस्थानी ध्वजवंदन केलं.

विधानभवनात विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्या हस्ते ध्वजवंदन झालं.

पुण्यातल्या शिवाजीनगरच्या पोलिस संचलन मैदानावर उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आलं. संयुक्त महाराष्ट्र चळवळीतल्या हुतात्म्यांचं त्यांनी स्मरण केलं.

सर्व जिल्ह्यांच्या मुख्यालयात ध्वजवंदनाचे कार्यक्रम झाल्याचं आमच्या ठिकठीकाणच्या वार्ताहरांनी कळवलं आहे. सर्व जिल्ह्यात काल मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षही सुरु करण्यात आले. नागपुरात मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाचं लोकार्पण नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते करण्यात करण्यात आलं.

महाराष्ट्र दिनाचं औचित्य साधून रक्तदान शिबीर, विविध स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम या द्वारे नागरिकांनी महाराष्ट्र दिन साजरा केला.

**<u>आयुष</u>**

आयुष प्रणाली आकर्षणाचं केंद्र बनत असून जनऔषधी केंद्राच्या धर्तीवर आयुष औषध केंद्र सुरु करण्याची कार्यवाही करण्यात येत असल्याचं प्रतिपादन केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केलं. पुण्यातल्या लोणावळा इथल्या  कैवल्यधाम योग संस्थेमध्ये दोन दिवसांच्या राष्ट्रीय आयुष मिशन परिषदेचं उद्घाटन काल त्याच्या त्यांच्या  हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. आयुष औषध केंद्र तहसील स्तरावर  उघडण्यात येणार आहेत. यामुळे आयुर्वेदासह आयुषच्या सर्व यंत्रणांची सर्व औषधे एकाच ठिकाणी स्वस्त दरात उपलब्ध होतील असंही जाधव यावेळी म्हणाले. आयुष मंत्रालयाच्या वाढत्या लोकप्रियतेबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केलं. ते म्हणाले,

**<u>कृतीआराखडा</u>**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून राबण्यात आलेल्या 100 दिवसांच्या सुधारणा मोहीम कार्यक्रमा अंतर्गत काल पहिल्या टप्प्याचं मूल्यमापन जाहीर करण्यात आलं. भारतीय गुणवत्ता परिषदेनं घालून दिलेल्या निकषांवर हे मूल्यमापन करण्यात आलं. त्यात कार्यालयीन सोयीसुविधा, तक्रार निवारण यंत्रणा, संकेतस्थळ कार्यक्षमता, गुंतवणूक अनुकूलता, नागरिकाभिमुख सेवा अशा विविध बाबींचा समावेश होता. या नुसार 48 विभागांपैकी 12 विभागांनी 100 टक्के उद्दिष्ट साध्य केलं आहे.

**<u>वृत्तविभाग</u>**

पुणे आकाशवाणी केंद्राच्या वृत्त विभागानं आपला सुवर्ण महोत्सवी वर्धापन दिन काल साजरा केला. वर्धापन दिनाचं औचित्य साधून विविध क्षेत्रातील मान्यवरांनी, श्रोत्यांनी वृत्त विभागाला भेट दिली. आकाशवाणीची एक बाल श्रोता ज्ञानदा कदम हिनं आपल्या भावना यावेळी व्यक्त केल्या.

बाईट—ज्ञानदा कदम

**<u>खेलरत्न</u>**

क्रीडा क्षेत्रातल्या मानाच्या मेजर ध्यानचंद खेल रत्न पुरस्कारानं काल बॅडमिंटनपटू चिराग शेट्टी आणि सात्विकसाईराज रान्कीरेड्डी यांना गौरवण्यात आला. युवक व्यवहार आणि क्रीडा मंत्री मनसुख मांडवीय यांनी 2023 या वर्षासाठीचा पुरस्कार या दोन खेळाडूंना नवी दिल्लीत प्रदान केला.

**<u>आयपीएलक्रिकेट</u>**

आयपीएल टी-ट्वेंटी क्रिकेटमध्ये काल  मुंबई इंडियन्सनं राजस्थान रॉयल्सचा १०० धावांनी पराभव केला. मुंबई इंडियन्सनं दिलेल्या २१८ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना राजस्थान रॉयल्सचा संघ ११७ धावांवर सर्वबाद झाला.या स्पर्धेत  आज, गुजरात टायटन्स आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यात सामना होणार  आहे.

**<u>उष्णतेचीलाट</u>**

देशाच्या काही भागात उष्णतेची लाट येण्याचा इशारा देण्यात आला असल्याच्या पार्श्वभूमीवर NHRC अर्थात राष्ट्रीय मानवाधिकार आयोगानं महाराष्ट्रासह 11 राज्यांना या लाटेच्या प्रभावाखाली येणाऱ्या लोकांचं संरक्षण करण्यासाठी तात्काळ प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यास सांगितलं आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, बाहेर काम करणारे कामगार, वृद्ध, मुले आणि बेघर यांना अधिक धोका असेल असं आयोगानं या राज्यांच्या सचिवांना लिहिलेल्या पत्रात म्हटलं आहे. आयोगाने या पत्रात, उष्णतेशी संबंधित आजारांवर उपचार करण्यासाठी निवारा व्यवस्था, मदत साहित्याचा पुरवठा, कामाच्या वेळेत सुधारणा आणि मानक प्रक्रियांची उपलब्धता करण्याचं आवाहन केलं आहे.

**<u>हवामान</u>**

राज्यात काल कमाल तापमान अकोला इथं 45 अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. सर्वत्र हवामान कोरडं असून विदर्भ आणि मराठवाड्यात काही ठिकाणी कमाल तापमानात सरासरीच्या तुलनेत किंचित वाढ झाली आहे. उद्याही असंच हवामान राहणार असून विदर्भात तुरळक ठिकाणी हलक्या पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार